प्रकरण ४थे

# ‘झावळं’ आणि ‘पखाल’ मधील समाजचित्रण

# प्रकरण ४ थे : 'झावळं' आणि 'पखाल' मधील समाजचित्रण


| अ.क्र. | घटक व उपघटक | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | प्रास्ताविक | ८३ |
| २ | 'झावळं' आणि 'पखाल' मधील कोळी समाजजीवनाचे चित्रण | ८४ ते १०५ |
| | १.कोळी समाजाचे परंपरागत व्यवसाय व दैनंदिनी | ८४ |
| | २.कोळी समाजाचे आचार-विचार देवधर्म व धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धा | ९१ |
| | ३.कोळी समाजाची जातपंचायत, पौराणिक-ऐतिहासिक लोककथा व प्राक्कथा. | ९६ |
| | ४.धरण आणि नळयोजनेमुळे कोळी समाजाच्या व्यवसायाची झालेली कोंडी. | ९९ |
| | ५.कोळी समाजाच्या समूह मनाचा शोध . | १०५ |
| ३ | कोळी समाजाचा इतिहास, आजचे मूलभूत प्रश्न व उपाययोजना. | ११२ |
| ४ | समारोप | ११५ |
| ५ | संदर्भ ग्रंथ सूची | ११८ |

# प्रकरण ४ थे :– ' झावळं ' आणि 'पखाल' मधील समाजचित्रण

## १ .प्रास्ताविक

' झावळं' ही उत्तम बंडू तुपे यांनी १९९१ साली प्रकाशित केलेली आणि बाबाराव मुसळे यांनी ' पखाल ' ही १९९५ साली प्रकाशित केलेली कादंबरी आहे. हया दोन्ही कांदबऱ्यातून कोळी समाजाच्या जीवनाचे चित्रण आले आहे. त्यामुळे हया दोन्ही कादंबऱ्याचा अभ्यास समाजर्जीवन चित्रणाच्या दृष्ठीने करणे हा या प्रबंधिकेचा मुख्य हेतू आहे.

'झावळं' कादंबरीत ' माणदेशी परिसर ' येतो तर मुसळेंच्या 'पखाल' मध्ये वऱ्हाड 'प्रांत येतो'. या दोन्ही विभिन्न प्रांतातील ग्रामीण कोळी समाजातील परंपरागत व्यवसाय व दैनंदिनी समाजाचा पोशाख, राहणीमान, आचार-विचार, धार्मिक श्रद्धा अंधश्रद्धा, रूढी- परंपरा, देवधर्म, पौराणिक-ऐतिहासिक लोककथा व प्राक्‌कथा, कोळी समाजाची जात पंचायत, धंद्यातील नैतिकता, कोळी समाजाची संस्कृती, भाषा, रीति ~~रित्ती~~रिवाज, कोळी समाजाचे समूहमन आणि परंपरागत व्यवसाय संपविण्यास कारणीभूतअसणाऱ्या धरण व नळ योजना या संबंधीची सविस्तर चर्चा समाजशास्त्रीय आणि तौलनिकदृष्या या प्रकरणात करण्यात येणार आहे. तसेच आजच्या कोळी समाजाचे मूलभूत प्रश्न व त्यावरील उपाय योजना या बाबतही काही मुद्दे मांडण्यात येणार आहेत.

१९४५ पर्यतच्या ग्रामीण कांदबऱ्यांनी मर्यादित चाकोरीतच आपले वर्णन चित्रीत केले परंतु १९६० नंतर खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याने ग्रामीणत्त्वाचे वेगवेगळे संदर्भ देत साहित्याला गतिमान केले. दरम्याजच्या काळामध्ये विविध जाती- जमातीचे चित्रण करण्याची परंपरा मराठी कांदबरीकरांनी चालवली त्यामधून त्या त्या समाजाचे चित्रणही ताकतीने मांडण्यात आले. त्याच वेळी महाराष्ट्रात औद्योगिक

,कृषी व शैक्षणिक क्रांती करण्याच्या प्रमुख हेतूंनी विविध योजना राबविण्यात आल्या याचा फायदा होणाऱ्यांना जरूर झाला. पण सुतार, लोहार, चांभार, कुंभार आदी बलुतेदारांचे जे परंपरागत व्यवसाय चालत होते. त्यावर विपरीत परिणाम या योजनांनी केला आणि त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणली.त्यांची कुटुंबे चरितार्थासाठी भटकंती करायला लागली. आणि हा विषय ग्रामीण कादंबरीकारांनी उचलून धरला. यादृष्टीनेच, ' जगबूडी' , 'बगाड ' , 'भस्म' 'शिदोरी ', 'गोतावळा' 'थापटनं' अशा अनेक कादंबऱ्यांनीआपले विषय समृद्ध केले. या कादंबऱ्यांनी विविध जाती -जमातीचे चित्रण करून त्यांच्यावर झालेला अन्याय मांडला या दृष्ठीनेच पाऊल टाकताना उत्तम तुपेनी 'झावळ' आणि ' बाबाराव मुसळेनी ' पखाल' या कादंबऱ्यातून कोळी या उपेक्षित जमातीच्या समाज जीवनाचे चित्रण केलेले आहे. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

## २.' झावळं ' आणि ' पखाल ' मधील कोळी समाजजीवनाचे चित्रण

'झावळं ' या कादंबरीत नदीवर मासेमारी करून जगणाऱ्या आणि ' पखाल ' या कादंबरीत नदीवर पखालीने पाणी भरून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या कोळी समाजाचे चित्रण करण्यात आलेले आहे. मासेमारी करणे व पाणी भरणे हा ज्या समाजाचा प्रमुख व्यवसाय आहे. त्या कोळी समाजातील रूढी -परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, जातपंचायत, संस्कृती, प्राक्‌कथा आदी बाबींचा विचार करू.

### १ . कोळी समाजाचे परंपरागत व्यवसाय व दैनंदिनी

या कादंबऱ्यातील चित्रीत कोळी समाजाचा परंपरागत चालत आलेला मुख्य व्यवसाय म्हणजे गावातील बलुतेदारांना पाणी पुरविणे हा

होय, त्या मोबदल्यात कोळी मिळेल त्या धनधान्यावर उपजिवीका भागवित होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होता परंतु नळ योजना व हापस्या या नवीन विज्ञान –तंत्रज्ञानाच्या, औद्योगिकीकरणाने पखालीचा धंदा बंद झाला. त्यामुळे कोळयांची कुचंबणा झाली. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली म्हणून त्यांनी उपजिविकेसाठी दुय्यम व्यवसाय म्हणून नदी–ओढयावरील मासेमारी हे व्यवसाय सुरू करून आपली उपजिविका भागवू लागला. कालांतराने सरकारची नदीवर पाणी अडवून तलाव बांधण्याची योजना आली आणि त्याच बरोबर त्यातील मासेमारीसाठी कॉन्ट्रॅक्टरची भूमिका अवलंबली. या सर्वाचाच परिणाम म्हणून ज्या कोळयांनी नदी हिच आपली शेती मानली होती. व जिच्यावर पोट–पाणी अवलंबून होते त्या कोळी समाजावर पुन्हा उपासमारीची पाळी आली. मग कोळी बांधवानी चुनाभट्टी ,म्हैस भळवणे, गुरांचे शेण विकणे, गुरांचा व्यापार करणे, दुध विकणे यासारखे अन्य दुय्यम व्यवसाय स्विकारले. परंतु या व्यवसायावर त्याच्या कुटुंबाची उपासमार होऊ लागली. कोळी माणसांची अवस्था कावरलेल्या कुत्र्यासारखी झाली. कुटुंबे भटकंती करू लागली आणि हयाच बाबीवर उत्तम तुपे व बाबाराव मुसळे यांनी लक्ष केंद्रीत केले. अशा या कोळयांच्या नशिबी आलेले दैन्य– दारिद्रय, शोषण, उपहास, अज्ञान, व्यथा–वेदना या विभिन्न प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी ' झावळं ' व ' पखाल ' कादंब–या लिहून वाचकांचे लक्ष केंद्रीत केले.

या कादंबऱ्यांमधील कोळीसमाजातील व्यवसाय , पोषाख, दैनंदिनी व्यवसायाच्या संबंधित दंतकथा, बलुतेदारांचे गिऱ्हाईकांचेविविध अनुभव या बाबतीतले विविध संदर्भ या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आलेले आहेत. ' झावळं ' या कादंबरीत तुपेनी मुख्य व्यवसायांचा संदर्भ दिलेला आहे. ऐन पावसाळयात नदीला पाणी आल्याने काशिनाथचा मासेमारीचा धंदा बंद होता. त्यामुळे त्यांच्या कुटुंबांची उपासमार होत होती. तो गावातील पुजा –आर्चाच्या जेवणावर दिवस पुढे ढकलत होता. एके दिवशी गावातील हरिणारायण यांच्या घरी

काशिनाथ गेल्यानंतर दोघांतील संवाद हा प्रमुख व्यवसायाची ओळख करून देतो.

" धनी, लई दिसानं गरिबांच ध्यान केलं? "

"काशिनाथ, भक्तिविजय ग्रंथ लावलाय, म्हणताना समाप्तीचे जेवण गावाला घालणार हाया ...... तवा पाणी भरायला लागलं, "

" का न्हाई ? खुशीने पाणी भरीन मी, पर गावानं रिवाज पार मोडीत काढलाय् आजकाल कार्यात कोळी लागत न्हाई गावांला. "

" गावाचं गावाबरोबर ! माझं माझ्याबरोबर वाड-वडीलांनी जे सांगितलं, ते पटाया पायजी, चुना बी घिऊन ये काशिनाथ " .

" जी, धनी, पर चुन्याच्या भट्टया मोडल्यात म्या "

काशिनाथ धा दिवस मासं मारायचं न्हायतं"

" कशाला मारू मासं ? गावांत कुणी खाईन. मुलाण्याची चार घरं हायती. त्यांस्नी बी कंटाळा आलाया मासं खाऊन. तरी गोदांवलं, पिंगळी हिकडं, वर पार मलवडीपातूर मांस घेऊन जातू. काय करायचं? त्याच्यावर पोटं हाय आमचं आता " (पृ.४१)'पखाल ' कादंबरीतील पुंजा हा थंडी, वारा, उन, पाऊस, यांना न घाबरणारा असा कष्टकरी आहे. मांडयापर्यंत वर खोचलेलं धोतर, अंगात फाटकं तुटकं शर्ट किंवा बनेन, डोक्यांवर मळकी टोपी, हातात म्हशीला हाकलण्यासाठी वावभर लांबीची चऱ्हाट अशा पोशाखातला पुंजा हा जातीनं कोळी आहे. तर ' झावळं ' मधील काशिनाथ थंडी, वारा, उन, पाऊस यांना न घाबरणारा नदीवरील मच्छीमार आहे. कमरेला धोतर, अंगात फाटका -तूटका बनेन, डोक्याला टापर, मांडीला सदैव लावलेली लंगोटी आणि हातात गरजेनुसार माशांचे जाळे अशा या पोशाखातला काशिनाथ हा देखील जातीनं कोळी आहे.

काशिनाथ आणि पुंजा हे दोघे कोळी आणि त्यांचे कुटुंब आपल्या व्यवसायातच वेळी-अवेळी ,रात्र-दिवसभर खपत

आहेत. या बाबतीतचे प्रस्तुत कादंबरीत अनेक संदर्भ आलेले आहेत. 'झावळं' मध्ये नदी हीच काळी आई मानून काशिनाथ हा शेतकऱ्यां प्रमाणे झावळं टाकून माशांची शेती करतो. या शेतीवरच त्यांचा चरितार्थ अवलंबून आहे. त्यामुळे त्यांची झावळंरूपी देवावर खूप श्रद्धा असल्याचे संदर्भ कादंबरीत अनेक ठिकाणी आलेले आहेत.

" शेतकऱ्यांनं आपल्या शेतातल्या पिकांकडं धाव घेतल्यागत काशिनाथ नदीकडं चिखल तुडवत पळाला " (पृ.६) " "नदी आपली शेती हाय, तिची जाळी आपलं ढ्यांव, त्याची सेवा-चाकरी करायची " (पृ.३१) " नाऱ्या , तुम्हची शेतं पिकली तसं माझं बी शेत आज-उदया पिकलं माझी शेतं त्यातलं पीक सगळच येगळ हाया " " कुठं हाया तुझं शेत ?" माझं शेत नदीच्या पाण्याखाली. दिवाळी झाली की, माझ्या शेताची मशागत करायची नव्या पाण्यानं आणलेलं पीक हया जाळयांन बाहेर काढायचं , पाण्यागत पैका बघायचा," (पृ.५१) " नाऱ्यां, नदीच्या पिकाचं बी आसचं याप बघ, शेतागतच पाण्याखाली लपल्यांची पिकं जपायची पर ते तुला न्हाय कळायचं त्यासाठी कोळयाच्याच पोटी जलमधिया पायजी " (पृ.५३)," आता आपली सुगी तोंडाला आलीय पिकं जपायला पायजीतं, न्हायतर ही पाणपाखरं काय ठिवायची न्हायती हे पाण्याखालचं धन जिवापल्याडर राखलं पायजे ही पाण्यातली पिकं जपली तर पोट भरता येत कोळयांला"(पृ.८३) "झोकात तुळशीची लग्नं लागली नि लग्नांचं कळसवणी पडल्या बरोबर नवऱ्या मुलीचं रंगरूप पालटांव,तसं शेतातल्या पिकांच रूप पालटलं हुतं, मातीखालच्या उबीत वाढलेली पिकं जोर धरून वाढीला लागली हुतीं, शेतांचं मालक, पिकं भांगलून कोळपून पिकांतल तण काढत हुता तसचं काशिनाथ बी रोज ढुपारचे पागिरं, कपडयाची वावरी घेऊन जात हुता. कवडयांची वावरी मांड्या - कंबरइतक्या खोल पाण्यात टाकून बारीक मांस धरून काटका, चांभार मासा, चालटी, धुळी,आसल्या माशांची पिल्ले धरून बाहेरच्या उन उन खडकावर टाकत हुता. नि मरळी, कोळशी, कानुशी, शिंगाडा, पहाडी

असल्या गोड्या जातीच्या माशांची पिल्ल पुन्हीदा पाण्यात जीव टाकल्यागत टाकत हुता. बाहेर उन्हात टाकलेलं मांस कावळे पळवत हुतं घारी झपटून लांब उंच उडत होत्या तवा काशिनाथ मोठा वैरी सरल्यागत नाचत हुता , (पृ.१०५) "उन्हाची बेडकं पाण्याच्या वर येऊन गवतात शिरली की, पिकात शिरलेलं ढोर झोडपावं, तसा काठीन झोडपून बेडकांचा जीव घेत हुता नि आपल्यालाच बोलत हुता, " (पृ.१०६) " काशिनाथ शाळू- जोंधळयाच्या राखणीला बसल्यागत गोफणीत दगड घालून बगळं, करकोचं उडवून लावत हुता" (पृ.११८) "पिकांची राखण शेतकरी करतो तसं झावळं राखलं पायजे, ते आपलं पिकलेलं शेत हाय, उदयाला झावळं कमावलं तर एका झावळयात तीन -चार हांर शेलका मासा घावलं. खिळा घातलाय् त्यात वामटी ,घोगरा मासा राहायला आलाय.",(पृ.१२०) "पिकलेलं शिवांर उन्हांत चमकांव तसं झावळयाखाली काशिनाथाचं पीक चमकत हुतं, (पृ.१२६) " हरिनारायण, तुमांस्नी शेतमळं हायती, माझां मळा देवानं, नव्ह हया सरकारनं जाळलं, माझी पिकं, माझं चंदेरी धन पार बुडलं, माझी आई मारून टाकली हया सरकारंन मला पोरकं केलं. आता माझं सुख-दु:ख मी कुणाला सांगायचं१ येळ परसंग आला तर, हया माझ्या आईच्या निळया पदराखालीच मला आधार हुता. हरिनारायणा काय झांल हे (पृ.१२८)असा हा काशिनाथ नदीलाच शेती मानून दिवसं - रात्रभर मासेमारी व्यवसाय करतो.

'पखाल' मधील पुंजालाही आपली पखाल पहाटे साडेचार पासून दुपारी १२ पर्यंत व नंतर ३ पासून पाणी संपेपर्यंत हाकावी लागते. याशिवाय गावाला लग्न समारंभ अथवा एखादा कार्यक्रम असला तर जास्त वेळ त्याला पाण्यासाठी खपावे लागते. पुंजावर उन-वारा - पाऊस यांचा कधीच परिणाम होत नाही. जणू ते त्याला सोयरेच होते. पाणी हे अत्यावश्यक गरजेमध्ये मोडते. त्यामुळेच त्याला अनन्यसाधारण महत्त्व नव्हे मूल्य असलेले दिसून येते. या विषयी पखालमध्ये एक संदर्भ आलेला आहे. जुन्या काळी तर मुलीचा बाप

मुलीला स्थळ बघायला आल्यावर अगोदर विचारायचा, " तुम्हच्या घरी पखाल चालू हाये ? होय, म्हटला तर सोयरिकीसाठी बैठक हुयाची . कारण सासू सूनेला पाणी विहिरीवरून आणायला लावी. पाय घसरतो वा दु:खणं येतं " (पृ.६७) .

कोळयाच्या धंदयात नैतिकतेलाही तेवढेच जपतात. झावळं ' मध्ये माशांची विक्री करतांनांचा एक प्रसंग आहे. राधीनं काशिनाथ कडून मासे विकत घेतले ? ५ रू. दिले त्यावर १०रू. घेतले व ५रू. परत देत म्हटलं, " मला काय करायचं पंधरा ? माझं मला धा हे कुणांच आक्रीत नगं मला " (पृ.३८) ' पखाल ' मधील कोळी लोकांची नैतिकता स्पष्ट करतांना मुसळे लिहितात, " कोळयांच्या धंद्यात एक गोष्ट अतिशय काटेकोरपणे पाळावी लागते. या धंदयात संबंध येतो तो बायकांशी, रात्री, बेरात्री घरात पुरूष मंडळी असतांना - नसतांना पखाली दयाव्या लागतात. पखाली घेणाऱ्या बायकांना पखाली देणाऱ्या कोळयाचा विश्वास वाटला पाहिजे. तरच हा धंदा करता येईल. गांवातल्या कोणालाही घरच्या बाई माणसांशी तसं वागणं म्हणजे आपणंच आपल्या पायावर आपल्या हातानं धोंडा मारून घेणं हा धंदा करतांना डोळे असून पहायचं नाही. कान असून ऐकायचं नाही. तोंड असून बोलायचं नाही. हे धोरण शिकांव लागतं. पुंजा बापाकडून शिकला होता. कोळयाला बायांच रडणं -अपाटणं नवं नसतं .बायकांनां कधी हात लावायचा नसतो.कधी कोणांच लेकंरू रडते वा एकलहात्या बायांचं पाणी स्वत:च भरावं लागतं". (पृ.१९,२०)

गिऱ्हाइकाला मासे विकत असतांना आणि बलुत्यांना पखालीने पाणी देत असतांना काशिनाथ व पुंजा कोळी यांना वेगवेगळे अनुभव येतात. कोळी समाज हा स्वाभिमानी समाज आहे. कुणाबरोबरही अन्यायाच्या विरोधात संघर्ष करण्याची ताकद त्याच्या जवळ आहे. तो मानाने राहतो. दुसऱ्याला मान देतो पण स्वत: वरील आरोप प्रत्यारोप खपवून घेत नाही. या गिऱ्हाईक बलुत्याच्या बाबतीत थोडेफार संदर्भ '

झावळं ' आणि ' पखाल ' कादंबरीत आलेले आहेत. ' झावळं ' मध्ये मासे घेण्यासाठी आलेल्या नाऱ्या घराचा उंबरठा ओलांडून आत येतो आणि सोनीला उलट बोलतो त्यावेळी सोनी त्याला स्पष्ट शब्दात सांगते.

" ए, रक्ताडया, नीट बोल, न्हायतर पायताणांनं थोबाडं सोलीन मासा सोलल्यागत " (पृ.१६)

तर मुलाण्याला म्हणते.

" आऽऽ रं जां ! आसं लई आलं आनं गेल बी देखनेवाले " (पृ.८)

'पखाल ' मध्ये पुंजा भल्या पहाटे नांदापूरकर मेव्हण्याच्यात पखाल टाकायला गेल्यावर तो मेव्हणा म्हणतो.

"का रे तुले लाज सरम हाये का नाही? चाल्लं कव्हाबी पखाल देयालेस, लोकांच्या लेकीसुना कां रस्त्यावर पडल्या कां ? तू झाला एक कोडगा, बोला बाई बोला पण पोटाला घाला म्हणता म्हणता पोरी सोरीच्या कबंरखाली हात घालणारा " (पृ.१९)

असे कुळांचे चित्र-विचित्र अनुभव या दोन्ही कादंबरीमधून मांडण्यात आलेले आहेत.

एकंदरीत 'झावळं' आणि 'पखाल' या कादंबऱ्यातील कोळी समाजाचे परंपरागत चालत आलेल्या मासेमारी व पखालीने पाणी वाढण्याच्या व्यवसायासंबंधी, या बाबतीत कोळी लोकांचा पोशाख आणि धंदा करीत असतांना आलेले गिऱ्हाईकांचे व बलुतेदारांचे अनुभव, धंदयातील नैतिकता या विषयीचे अतिशय समर्पकपणे चित्रण करण्यात आलेले आहे. यामधून कोळी समाजाचा व्यवसाय हा खऱ्या अर्थाने धंदा नसून समाजसेवा आहे याचे प्रत्यंतर येते.

# २ कोळी समाजाचे आचार-विचार,देवधर्म आणि धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धा-

'झावळं' आणि 'पखाल' या कादंबऱ्यातून कोळी समाजजीवनाचे चित्रण करताना प्रस्तुत कादंबरीकारांनी कोळी या जमातीत रूढ असणारे आचार-विचार,देवधर्म व श्रद्धा-अंधश्रद्धांचा संदर्भ अनेक ठिकाणी दिलेला दिसून येतो. याबाबतीत कोळी लोकांचा आचार-विचार स्पष्ट करताना आपणाला प्रथम ही बाब लक्षात घ्यावी लागेल की, काशिनाथ व पुंजा हे मासेमारी करणारे आणि पखालीने पाणी वाढणारे कष्टकरी माणसे आहेत. दोघांचे पोशाख साधे-सुधेच आहेत. राहणीमान-नैतिकता चांगली आहे. आपल्या व्यवसायाच्या संबंधित अनेक श्रद्धा-अंधश्रद्धा त्यांच्या ठायी आहेत. कोळी हा एका समाजात खालच्या मानलेल्या थरातला एक सामान्य गरीब माणूस परंतु मनाने किती मोठा,श्रीमंत असू शकतो याचे सुरेख दर्शन या दोन्ही कादंबरीतून आपणास पहावयास मिळते. ही माणसे अशिक्षित असूनही मोठ्या मनाची सुसंस्कारीत असू शकतात याचाही दाखला सदर कादंबऱ्या वाचून मिळतो. आपल्या बलुत्याची प्रामाणिक सेवा करणे त्यासाठी दिवसरात्रभर वेळी-अवेळी राबणे ही आपली कर्तव्येच समजून तशी दैनंदिनी कोळीसमाज जगतो आहे, वागत आहे. आपले खडतर जीवन जगताना तो गावातील राजकारणाचा,समाजकारणाचा कसलाच विचार करीत नाही. दुसऱ्यांशी मध्यस्ती करीत नाही ना कुणावर अन्याय -अत्याचार नाही. गिऱ्हाईकांना मासे देताना जास्त आलेले पैसे परत करतो. असा साधारणपणे कोळी जगत असला तरी तो स्वाभिमानी आहे. कष्टाळू आहे. जर कोणी आपल्यावर हात टाकला,उलटा बोलला, अन्याय केला तर त्याची संघर्ष करण्याची त्याला जाब विचारण्याची आणि प्रसंगी मरण्याचीही तयारी आहे असा हा कोळी गावातील बारा-बलुतेदारांपैकी एक बलुतेदार म्हणून प्रत्येक गावात वावरत आहेत.आपला धंदा हीच समाजसेवा व उदरर्निवाहाचे साधन म्हणून करीत आहे. कोळी समाज हा

श्रद्धाळू आहे. त्याचा महादेव ,खंडोबा,म्हसोबा,भैरीनाथ. माऊलाया, साती-आसरा, आदि देवांवर विश्वास आहे तसेच नदी ,पखाल,रेडा,जाळे यांच्यावरही तेवढीच श्रद्धाळू असून त्यांना तो देवासमान समजतो. या सर्व देवाधर्मासाठी त्यांची काहीही करण्याची तयारी आहे.शिंगणापूरचा महादेव हे कोळी जमातीचे आराध्यदैवत त्याची पुजा करणे व सेवा करणे हा कोळी समाज आपला धर्म मानतो. यासंबंधीचे लोकगीत डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या'जनलोकांचा सामवेद' या ग्रंथात संपादित केले आहे.

"बळी म्हणून बळी बळी राजा मोठा शाना,
शंभुदेवाचा म्हेवणा आधी चढतो दवना
शिंगणापूरीच्या वेशीत कसली झाली आरोळी
शंभू महादेवाच्या माझ्या ध्वज लावून गेला कोळी"[३]

'झावळं'या कादंबरीत काशिनाथ हा नदीवर मासेमारीसाठी गेल्यानंतर, मासे पकडल्यानंतर तो आपल्या देवांना विसरत नाही यासंबंधिचे श्रद्धा-अंधश्रद्धा विषयक या कादंबरीत आलेले संदर्भ पुढीलप्रमाणे,"देवा,भैरवनाथा,खिनभर त्या आभाळातल्या दैत्याला थोपवून धर,माझी सोना गावात गेलीया, तिला निवाऱ्याला येऊ दे, मग कोसळ म्हणावं",(पृ.३) "देवाला आपली फिकीर हाय,झावळं कमवल्याबिगर त्यो नदीला पाणी कसा सोडंल?",(पृ.४) "ए, घाई करू नका, कुळस्वामी"खंडेरायाचा भंडारा टाक हाऱ्यावर मंजी मासं बिगिद्यानं खपत्येल आपल्या देवाला इसरून जायाचं न्हाय बरं", (पृ.८) " ह्या येळंला कुणीतर यावं,मला बळ द्यावं,ह्यो धारंतला म्हसोबा पाण्यातल्या साती-आसरा,वरच्या माऊलाया व सोननं धावक्ता वर्सातनं निवद ,नारळ खात्यात नि असल्या परसंगाला कुठं गप हुत्यात ? या उठा, देवानू मला आधार द्या, माझं धन पाण्यात चाललं, पाण्यातलं पीक पिकलय हाताला आल्याला शेर हाया, न्हाई,तुमास्नी माझी कीव येणार न्हाय!" (पृ.१३)

"देवानं,झावळं बुंडवलं पर दैवानं,नशिबान माझं गेल्यालं धन दिलं, भगवंत,दयाळू,कनवाळू हाय. माऊलाई, म्हसोबा खरं

पावला."(प.२०)

याचबरोबर नदी हेच काशिनाथचे सर्वस्व असल्यामुळे तो नदीलाच माता मानतो. तिची पूजा-अर्चा करतो या माय-लेकरांचे संबंध 'झावळं'मध्ये पुढीलप्रमाणे आलेले आहेत."सोना,नदीवर तर आपला जीव. नदीला येताना मरान संग घिवून यावं लागतं नि पाण्यातनं वर निघालं,की मरान पाण्यात सोडून वाट धरायची आस्ती. आसं मरणाला भिऊन जगता येतं काय कुणाला ? मरणासंग झगडा केला की, मरण आपल्याला भिऊन पळतं बघ सोना", (पृ.४२) "आय, नदीमाय,आसचं ह्या लेकराला सांभाळं, बरकत दे, धंद्या पाण्याला कुठं तरी आराव, तुझ्या पदराच्या कोपऱ्याखाली चालता शेर-पाणी मिळू दे, पोट भरू दे गरीब लेकराला"(पृ.७०) "निळ्या मखमालीवर रांगत चाललेलं काशिनाथ राजपूत्रांसारखा दिसत होता नि खाली नदीच्या पोटातलं धन,सोन्याचांदीच्या जित्या ऐवजाचा शोध घेत अल्याडच्या तटाकडं निघाला हुता, बारक्या पोरानं आईच्या खांद्यावर खेळावं तसा नदीच्या निळ्या पाण्यावर खेळत हुता खर आईचं त्याची पाण्याच्या रूपाने त्याला जीव लावत हुती आपल्या लेकरासंग बघितल्यागत हजार डोळ्यांनी काशिनाथकडं बघत हुती नि तळहातात फोड फुटल्यागत जपत होती ती नदीमाय"(पृ.९२), "मनाजोगा पाऊस पडला हुता नदीला पानलोट येऊन गेला हुता. नदीनं तिळगूळ वाटल्यागत नदी 'बाळा ,झालं तुझ्या मनाजोगं ? लई राग धरला हुतासा माझ्यावर! आतनं नदीचं बोलल्यागत वाटलं नि सपई पाण्यावर बारक्या रेघा काढत वाऱ्याची एक झुळुक निघून गेली.,(पृ.११६)"काशिनाथ नदीचं निर्मळ खोल खोल पाणी बघून सगळं दु:ख विसरून जात हुता"(पृ.११७) काशिनाथ हा नदीलाच आपली माता मानून सारं सुख दु:ख सांगून आपले जीवन सुखासमाधाने जगत होता. नदीप्रमाणे काशिनाथही अळकुटं,तिवरी,भुसं आदि जाळ्यांना देवासमान मानून तो त्याची पूजा अर्चा करतो. मुलासोबत खेळल्यासारखं खेळतो त्याचे संदर्भ याप्रमाणे, "काशिनाथच्या हातातून डगवल्यालं पागिरं त्याच्या हातावर बाळागत खेळताना काशिनाथला खुशी हुयाची,

आपल्या बाळाचं नाकं,तोंड पुसून काढल्यागत काशिनाथ पागिऱ्यात गुंतल्यालं नखा-बोटांनी काढता-काढता पागिऱ्याच्या सुताची घरं जीव सोडल्यागत सोडवत हुता.पागिऱ्यात गुंतल्याला मासा धडपडावा तशी त्याचीच सावली पागिऱ्यात धडपडत हुती त्याच्या सावलीच्या शिराच्या वरच्या बाजूचां पागिरं वीतभर फाटल्यालं बघून काशिनाथच्या जिवाची नुसती तगमग झाली",(पृ.१) "नदी आपली शेती हाय,तिची जाळी आपलं द्यावं. त्याची सेवा-चाकरी करायची"(पृ.३१) जाळ्यामुळेच काशिनाथला दोन-तीन हारे मासे दिवसाला सापडत होते. त्यामुळे त्यांच्यावर त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगला चालला होता. जाळे हीच बापाची जहागिरी आहे, तेच जगण्याचे भांडवल आहे असे मानून तो जाळे कुटुंबातील एक घटक आहे असे समजायचा व त्याची सेवा करायचा.

'झावळं' या कादंबरीप्रमाणे 'पखाल' कादंबरीतही पुंजा या कोळ्यांचे देवधर्म व श्रद्धा अनेक ठिकाणी आपल्या वाचकांच्या प्रत्ययाला येतात., "आपल्याले जातीत महादेवाची नियत हाये,महादेवाच्या पाया पडून आल्याबिगर नवऱ्याला हात बोट लावू द्यायचं नाही. माणसांची जात उतावीळ पण बाईनं दम धरावं भलता सलता भ्रष्ट्राचार करायचा नाही,'हुतू हूतू कुठं मूतू ' करायचं नाही " (पृ.७०) पखालीचा रेडा हा म्हसोबा असतो. 'रेड्याची सेवा करणे म्हणजे म्हसोबाची करण्यासारखी असते' याशिवाय 'झावळं' मध्ये काशिनाथ जाळ्यांना जसे सर्वस्व मानतो तसाच पुंजा देखील 'पखाल' हेच सर्वस्व मानून त्याची दररोज पूजा करतो. दर्शन घेतो. एवढेच नव्हे तर पहाटे भरलेली पहिली पखाल ही मारूतीच्या पायरीला घालतो. (पृ.१७) असे बरेच संदर्भ 'पखाल'या कादंबरीत आलेले आहेत.

कोळी समाज हा ज्याअर्थी महादेव, खंडोबा, भैरीनाथ, साती आसरा,म्हसोबा,माऊलाचा या देवावरती तसेच नदी, पखाल,रेडा,जाळी यावरती श्रद्धा ठेवतो त्याचप्रमाणे त्यांच्या कडून या श्रद्धेला अनुसरून अंधश्रद्धादेखील नकळत जपली जाते. या कोळी जामातीची अंधश्रद्धेला ही त्याच्या पखालीने पाणी वाढणे आणि मासेमारी करणे या धंद्याशी

संबंधित असलेली दिसून येते. 'झावळं' मध्ये तुपेंनी याबाबी स्पष्टपणे मांडल्या आहेत. 'पावसात इस्तू टाकला की पाऊस उघडतो'(पृ.६) 'गावात पाणी भरायचं सोडून मासं धरताय पाण्यातलं. ते साधूसंत हायेत. त्यांची हत्या करून पोट जाळताय कुठं फेडचीला हे पाप? (पृ.१५), 'देवानं झावळं बुडवले,पर दैवानं, नशिबानं माझं गेल्यालं धन दिलं भगवंत दयाळू, कनवाळू हाया, माऊलाई, म्हसोबा खरं पावला',(पृ.२०)"बोंबील खावून माशाला गेलं की, सगळी बोंब हुती हे ठाव न्हाय का तूला" (पृ.४१), "गरवारपणात खेकडा खाऊ नये,पोर फेकडी हुत्यात. खेकड्यागत चालल्यात" (पृ.४३). "तुमास्नी काय देव धरम हाय का न्हाई? कुणच्या येळेला काय करावं ह्याच ध्यान करा भगवंतान माशाचा अवतार घेऊन ही सृष्टी तारलीस त्याची हत्या ही ह्या महिन्यात तरी करू नगासा. मासं पाण्यातले योगी त्यांची हत्या करता नरकात जातालं बरे."(पृ.४३), "काश्या, तू काय बी म्हण, ही जागाचं गलथान हाय, जागेनं आपली तीन-चार माणसं पाण्याखाली घिटल्याती" "जाग्याला काय धाड बसलीय सुब्या! आपुन चांगल पायजी बायकासंग निजून तसाच पारोसं अंग घेऊन पाण्यात उतरला आसशिल "(पृ.१०७), "पालीला जाऊन पोरगं भंडार खोबऱ्यात जाखायचं" (पृ.११३), "पोरगा झाला त्याच्या पायगुणाचा ह्यो लाभ! पोरगा दैवानं झाला "(पृ.११०) "सोने, गावात जाययचं, पर ह्या अंगाला गावाचा मसवटा हाय,सव्वा महिन्याची तू बाळातीन त्या बाजूनं जाणं बरं नव्हं."(पृ.११३)

अशाप्रकारे 'झावळं' आणि 'पखाल' या कादंबरीत कोळी समाजाचे आचार-विचार,देवधर्म व धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धा ह्या स्पष्ट झालेल्या दिसून येतात. यामुळे कोळी समाज हा साध्यापणाने राहणारा कष्टकरी बलुतेदार आहे. त्यांच्या आपल्या व्यवसायाशी निगडीत देवावरती श्रद्धा-अंधश्रद्धा असलेल्या दिसून येतात.

# २.कोळी समाजाची जातपंचायत,पौराणिक- ऐतिहासिक लोककथा व प्राक्कथा

आजचे वधू-वर सूचक वा पालक मेळावे म्हणजेच पूर्वीच्या काळातली जातपंचायतीची सूधारीत आवृत्ती होय. विविध जाती-जमातीच्या बरोबर 'कोळी वधू-वर, पालक सूचक मेळावे ' हे तालूका जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येतात. आज जरी असे मेळावे होत असले तरी पूर्वीच्या काळी ' कोळी समाजातही' अशी जातपंचायत होत होती त्याचे थोडे फार संदर्भ पखाल कादंबरीत बाबाराव मुसळे यांनी दिलेले आहेत.

"सुदीचा महादेव म्हणजे कोळ्याचं कुलदैवत होतं ह्या महादेवाची स्थापना तेलंगणाहून आलेल्या कोळ्यांनी केली. या यात्रेला दुरदुरून कोळी समाज मोठ्या प्रमाणात जमा होतो. या महादेवाची महाशिवरात्रीला यात्रा भरते. वारकऱ्यांची जशी आषाढी-कार्तिकी तशी कोळ्यांची महाशिवरात्रीची यात्रा या यात्रेच्या निमित्तान आपाआपसातील वाद मिटवणे, फारकत्या करणं, कपडे लत्ते -भांडी-कुंडी खरेदी करणं, या भाऊबंद, सोयरे-धायरे, जाती बांधव यांच्या भेटीगाठी घेणं, सोयरिक-धायरिक करणं, सुत पायऱ्याचे बांधणे असेल तर समेट घडवून आणणे. या सर्व गोष्टी यात्रेच्या निमित्ताने घडतात. या जत्रेत दुकानदार पाचची वस्तू दहाला विकतात व महिन्यात कमाई करतात.वस्तू घेणाराही घेतो कारण मोकळ्या हातानं खर्च करण्यासाठी आलेला असतो. यात कोणी खाण्यापिण्याच शौकीन तर कोणी तमाशा सिनेमाच. यात कुस्त्या मारणारे पैलवान तर काही टकरीचे शौकीन. सगळ्यांना यात्रा म्हणजे अप्रुक वाटते. संसारातील कटकटी विसरून चार दिवस मजा मारतात. बहुतेक लोक कुटुंब कबिला घेऊनच येतात. यात्रेतच सभा भाषणे होत. सगळ्या-सगळ्या गोष्टी आती संबंधी असतं कोणावर कुठं, कसा अन्याय झाला, त्याच कसं निवारण केलं सरकारनं कोणत्या सवलती देवू केल्या. आपल्या समाजास अजून कोणत्या सवलती हव्या आहेत. या

गोष्टी ते समजावून सांगतात " (पृ.६२)

कोळी समाज हा या सुदीच्या महादेवाच्या यात्रेनिमित्त एकत्रित येतो व आपआपसातील तंटे-वाद मिटवून सोयरिक जमवितो. समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय सुधारण्याच्या बाबतीत चर्चा करतो. सरकारी योजनांचा आढावा घेतो. यामुळेच हा समाज विकासाच्या दिशेने जात असलेला आपल्या लक्षात येईल.

कोळी समाजाच्या जातपंचायतीच्या संदर्भाप्रमाणेच मासेमारी करणे, पखालीने पाणी भरणे या धंद्यांच्या संबंधीत तसेच महादेव या कुलदैवताबरोबर नदी, कासव, पखाल यांच्यासंबंधीत ' झावळं ' आणि ' पखाल ' कादंबरीतून काही ऐतिहासिक-पौराणिक, प्राक्कथा व लोककथा सांगितल्या आहेत.या

प्राक्कथासंबंधी भालचंद्र नेमाडे लिहितात की, " प्राक्कथा संज्ञा मुळात पौराणिक,धार्मिक,लोकविद्या अशा प्राचीन 'कहाण्या' साठी म्हणजे परंपरेने सार्वत्रिक करून टाकलेल्या कथांच्या घाटासाठी वापरली जाते. प्राक्कथांचे प्रत्येक संस्कृतीत फार मोठे प्रस्थान असून त्यांना वैश्विक स्थान ही सहजासहजी प्राप्त होते, इतके आदिम रूपबंध प्राक्कथा मध्ये असतात".[२] याअनुषंगाने कोळी समाजाच्या धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धा, आचार-विचार, रूढी-परंपरा, संस्कृती रीतीरिवाज आदी बाबी प्रस्तुत कादंबऱ्यातून लक्षात येतात यातून कोळी समाज हा महादेव, वाल्मिकी, राम यांना प्रमाण मानतो. आणि आपले दैनंदिन जीवन यशस्वी करतो. ' झावळं ' मध्ये आलेल्या कथा पुढीलप्रमाणे.

१. " आम्हाला कासव खायला मुभा न्हाई. कवा तरी देवानं कासवाचा अवतार घिऊन ही सृष्टी तारलीय. कासवाच्या पाठणीवर देवाची पावलं ' पादूका ' मांडल्यागत हायती, म्हणताना आमी कासव खात न्हाई, कासवं जाळ्यात गुतली, तर काढून टाकायची. " (पृ. १०६)

२. " दैवानं, आम्हाला मुभा दिलीया, राम वनवासाला चालला, तवा आमच्या पूर्वजानं त्याला आपल्या नावंतनं पल्याड सोडलं तवा रामानंच सांगितलं तवापासनं आम्ही मासं खातो नि जगाला बी चारतो " ( पृ. १०६ )

' पखाल ' मध्ये आलेल्या कथा पुढीलप्रमाणे.

३. " आपलं आधीच्या जन्माचं काही पाप असेल म्हणून आपण कोळ्यांच्या तेही अशा पाणी भरणाऱ्या पोटी जन्माला आलो. आपलं पूर्व जन्मीचं पुण्य असतं तर आपणही घरंदाज पाटलाच्या कुळात जन्मलो असतो " (पृ.१२७)

४. " मोघलाच्या काळात गाव लुटून पाच बायकात एक कोळ्याची नेली. तिने महादेवाचा धावा केला. पळणारा घोडा जाग्यावरच थांबला, ' ये सब इस औरत के कारण हुआ ' म्हणून सोडून दिलं " (पृ. ५०)

५. " आपल्याले जातीत महादेवाची नियत हाये, महादेवाच्या पाया पडून आल्याबिगर नवऱ्याला बोट लावू द्यायचं नाही. माणसांची जात उतावीळ पण बाईनं दम धरावं, भलता-सलता भष्ट्राचार करायचा नाही ' हुतू हुतू कुठं मूतू ' करायचं नाही " (पृ. ५०)

६. " पुरातन काळात महादेवाचं पार्वतीशी भांडण झाले. तेव्हा महादेव रूसून पृथ्वीवर आला. पंचमठीच्या डोंगरावर उतरला तेथे राहणाऱ्या एका आदिवाशी कोळी तरूणीला पाहून तिच्यावर भाळला अन् तिच्याबरोबर संसार करू लागला.

तिच्यापासून जी पैदास झाली ती महादेव कोळी " (पृ. ५४)

यापद्धतीने कोळी समाजात परंपरागत चालत आलेल्या पखालीने पाणी वाढणे व मासेमारी करणे याबरोबर इतर संबंधीतही प्राक्कथा -ऐतिहासिक लोककथा आलेल्या दिसून येतात. कोळी समाजात अशा अनेक कथा आहेत. महर्षी व्यासमुनी, महर्षी वाल्मिक, एकलव्य, तानाजी मालुसरे मच्छगंधा यासारखे अनेक ऐतिहासिक-पौराणिक महापुरूष कोळी जमातीत जन्मलेले आहेत. बरेचशे कोळी लोक हे धनधाकट होते. त्याविषयीचा पोवाडा डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी आपल्या 'ढांगडी पोवाडा: स्वरूप व सौंदर्य' या लेखात समाविष्ट केला आहे,

" कोळी सराईत भालारी | मुंडा हात जोडा त्याच्या पायाला
भवऱ्यावाणी खिळं होती जोड्याला | दंडावाणी मिशी गबरूला
लिंबावाणी डोळं बहादुराला | दीड हात छाती मर्दाला " [३]

यापद्धतीने या प्रकरणात कोळी समाजाच्या संबंधीत ऐतिहासिक-पौराणिक कथांचा विचार येथे केला आहे.

## ४. धरण आणि नळयोजनेने कोळी समाज्याच्या व्यवसायाची झालेली कोंडी.

' झावळं ' या कादंबरीत उत्तम बंडू तुपे यांनी नदीवर मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह परंपरागत चालविणाऱ्या मच्छिमार कोळी समाजाचे चित्रण केलेले आहे. ही कादंबरी काशिनाथ या व्यक्तिभोवती केंद्रीत असून कोळी समाजाचे नदीवरील शेतीचे, बाजारातील गिऱ्हाइकांचे संदर्भ दिलेले आहेत. आपणाला हेही माहितच आहे की, कोळी समाज हा नदीवरील झावळ्याला सर्वस्व मानतो.आपला उदरनिर्वाह कसातरी भागवितो अशे असतानाही सरकारने १९६० नंतर

औद्यागिकीकरणाच्या नावाखाली नदीचे पाणी अडवून धरणे बांधली व ते पाणी पाटाने अनेक शेतकऱ्यांच्या शेतोशेती पोहचवले. ही बाब शेतकऱ्याच्या दृष्टीने फायद्याची आहे परंतु नदीवरती ज्यांचे कुटुंब जगते आहे त्या कोळ्यांच्या धंद्याचे काय?सदर धंदा पूर्णपणे बंद पडल्यामुळे कोळी कुटुंबे उपासी मरू लागली.त्यांना जगणे अवघड झाले. आपला परंपरागत चालत आलेला धर्म बुडाल्याने सुखाने संसार करणारा कोळी समाज पोरक्या अवस्थेत जगू लागला. पूर्वजन्मीच्या पापाला दोष देऊ लागला. कोळी समाजाला मासे देणारी नदीरूपी बँकेतच खडखडाट झाल्याने कोळी समाजाचे झावळं कोरडे पडले. एवढेच नव्हे तर जी धरणे झाली. त्या धरणावरती सरकाने मासेमारीसाठी कंत्राटची भूमिका अवलंबली त्यामुळे जे सत्ताधारी, पैसेवाले होते त्यांनी धरणावरील मासेमारी आपल्या ताब्यात घेतली आणि समाज हळूहळू दुभंगत चालला जीवनाच्या नवीन वाटा शोधू लागला. दुसरे व्यवसाय शोधू लागला परंतु त्यांच्या हाती शेवटी काहीच न सापडल्याने या समाजाच्या व्यवसायाची कोंडी झाली. एकेकाळी स्वाभिमानाने जगणाऱ्या या समाजाकडे दुसरे लोक उपेक्षित, दारिद्र्यात गुरफटलेले अशा अर्थानी पाहू लागले. याचेच संदर्भ 'झावळं' या कादंबरीत बऱ्याच ठिकाणी आलेले दिसून येतात.

> "हरिनारायण, तुमास्नी शेतमळं हायती, माझा मळा देवानं नव्हं हा सरकारनं जाळलं माझी पिकं,
> माझं चंदेरी धन पार बुडलं, माझी आई मारून टाकली ह्या सरकारनं मला पोरकं केलं, आता माझं सुख-दु:ख मी कुणाला सांगायचं ? वेळ परसंग आला ,तर ह्या माझ्या आईच्या निळ्या पदराखालीच मला आधार हुता हरिनारायणा, काय झालं हे!"(पृ.१२८)
>
> "बघा, बघा, ही पाखरं उडून चालली काय बेमान जात झाली पाणी हुतं तवर नदीवर सावली धरली."
>
> "काशिनाथ, आता पाखरं हितं राह्याची न्हायती बर बिदालाला जातेली"

"का? तिकडं काय हाया ?"

" आता तलाव पूर्ण झाला नदीचं सगळं पाणी वर अडवून धरलं सरकारनं" हरिनारायण बोलला काळीज कापल्यागत काशिनाथ मटकरून खाली बसला.

"हरियाणातं, आता कसं जगायचं"

"ह्या पाखरांसारखं काशिनाथ ! पाखरासारखं जगायला शिका" (पृ.१२८)

"गावाच्या वरनं झालेला बिद्दाल पाट पाण्यात भरून खळखळ वाहत हुता. निळ्या पाण्यानल्या जिवावर हिरवी रानं उंच उंच होऊन डोलत हुती. काशिनाथ पाण्याच्या पाटात जीव सोडून हिरवा-हिरवा झाला होता नि रोज पाण्यात भिजणारी देही मातीनं मळवून घराकडं येत हुता जित्या सोन्याच्या कांबी उचलणारं सोनीचं हात तिच्या चंदेरी पिकाला मुकलं होतं नि हातात काटं-काटं टोचून घेता घेता हिरवी पिकं भागंलत हुती नि नितंनेमानं नदीच्या कोरड्या वाळूत पडलेल्या झावळ्याच्या काट्या मोडून आणून पोटं शिजवत हुती"(पृ.१२८)

अशारितीने एका धरणामुळे त्या मार्गावर असणाऱ्या नद्या व त्यावर मासेमारी करणारी कोळी समाज यांच्या वाताहातीचे तसेच सामाजिक, राजकीय,भौगोलिक, आर्थिक,शैक्षणिक, व सांस्कृतिकदृष्ट्या चित्रण या कादंबरीत तुपे यांनी केलेले आहे.

'झावळं' या कादंबरीप्रमाणे 'पखाल' या कादंबरीतही बाबाराव मुसळे यांनी औद्यागिकीकरणामुळे एका बलुतेदारीचा अस्त कसा झाला हा विषय चित्रीत केलेला आहे. या कादंबरीत पखालीने परंपरागत पाणी वाढण्याचा व्यवसाय करणाऱ्या पुंजा या कोळ्यावरती नळयोजनेने कसा घाव घातला आणि त्यांचे सहकुटुंब कसे कावरलेल्या कुत्र्यावाणी कावरेबावरे केले याची कहाणी सांगितली आहे. ही कादंबरी म्हणजे पुंजा व त्याच्या कुटुंबाची शोकांतिका आहे. पखालीने गावातील बलुत्याला

पाणी वाढणे आणि त्यामोबदल्यात मिळणाऱ्या धनधान्यावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणे हा कोळी समाजाचा पिढीजात चालत आलेला धंदा होता. यावरती सर्व कोळी समाज आजपर्यंत सुखासमाधानात जगत होता. परंतु सरकारने ग्रामसुधारणेच्या नावाखाली 'नळयोजना' आणली. त्याचाच परिणाम कोळी समाजाच्या या धंद्यावरती झाला आणि त्याचा धंदा बंद पडला. त्यामुळे कोळी समाजाला जगणे मुश्किल झाले. इतर व्यवसायाच्या शोधात कोळी समाज हिंडला पण तो स्थिर होऊ शकला नाही. ही सरकारी नळयोजना पखालीची रांडवबाई ठरली. कोळी कुटुंबाच्या नाशाला तिच जबाबदार आहे, नव्हे. तिने कोळी समाजाच्या व्यवसायाची कोंडी करून कोळी धर्म बुडवलाच त्याचबरोबर नळयोजनेच्या पाण्यात सर्व कोळी माणसे, कुटुंबे गाडून मारली नळयोजनेच्या, हापस्यांच्या आगमनाने कोळी समाजाचे जीवनमान अंधारमय कसे झाले यासंबंधीचे दाखले 'पखाल' कादंबरीत आलेले आहेत.

'हापशा पाडणारी मशीन जणू त्याच्या काळजाला भोकं पाडत होती",(पृ.१)

"आली मुत्तामारी नळयोजना काय कपाळचं कातडं नेणार हाय ती आमच्या",(पृ.१०)

"ही नळयोजना आपल्यामागं एखाद्या कैदाशिनीसारखी लागली, धंदा बंद झाल्यावर कोणाच्या बबुंऱ्या खाशील",(पृ.४२)

'विहिरीवरील ब्लास्टिंग मशींनचे बार ऐकले म्हणजे आपल्या काळजाच्या चिंधड्या होत आहेत. असे वाटे तर पाण्याच्या टाकीचे गज सिमेंट ओतून तयार केलेले खांब जणू आपल्याला फाशी देऊन लटकविण्यासाठीच उभे केले जात आहेत अस वाटायचं तो आतल्या आत प्रचंड अस्वस्त व्हायचा",(पृ.८०)

"घेता का व्ह पखाल" म्हणत पुंजा फिरायचा ,( पृ.८५)

"किती घातल्या आण्यावाणी करतसं रे भाकरीपोटी ? लयचं लेकरं उपासी मरत असतील तर चार घरी भीक माघावं" ,(पृ.८५)

"पाण्याची टाकी म्हणजे आपलं थडगं आहे कारण पखालीसारखा कवडीची अक्कल खर्च न करता येणारा दुसरा धंदा येत नव्हता.",(पृ.१२३)

"पुंजाला नळयोजनेचं वावडं होतं म्हणून लोक चेष्टा करीत "

"अव् गावात नळ त येऊ दे मग पाहाय घरात जागजागी नळ घेतो. मग तुह तुझ्या नवऱ्याचं तोंड पाहायची गरज पडणार नाही पण ह्या योजनेचे मड काऊन लवकर जायेना देव जाणे. मले तर वाटते आजच नळ यावे" (पृ.१२९)

पुंजाचे नळयोजनेचं काम जसं उरकू लागलं तसतसं वागणं भ्रमिष्ठासारखं वाटू लागलं. विचाराविचारात आपण काय करायलो याच भान राहिना. ज्या बाईला पखाल दिले तिच्या दारी पुन्हा पखाल घेऊन जायाचा. अर्धी तशीच नदीवर न्यायचा एकदा तर रिकामी पखालच गावात आणली. अन् बलुतं भांडे आणायचे अगोदरच तोंड सोडून मोकळी केली... यामुळं गावात पागलपणाची चर्चा सुरू झाली"(पृ.१३२)

"गिरीजाच्याही मनावर परिणाम झाला. सुमननं पाय धुवा म्हटलं रानातून आलाय तर आंघोळ करून बसल्या मनावर ताण पडलाय"(पृ.१३३)

"आधि आपल्यात ताकद होती. नळयाजनेच काम चालू झाल्यापासून आपण थकत थकत चाललो असं आपल्याला वाटते. त्या कथेतल्या शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकलेल्या सिंहासारखी आपली गत झाली. त्या सिंहाला तरी लहानसा सोबती उंदीर होता. आपल्याला कोण एवढा जीवाचा जिवलग सोबती आहे? आपली बायको? पोर, सुन,सगे-सोयरे? कोणीच नाही. एक आपण एकटे वाल्या कोळ्यासारखे कोणापाशी जावं. आपलं दु:ख सांगावं कोण आहे तसा? "(पृ.१३३)

"आपल्या पखालीऐवजी नवी-नवरी पखालीची सवत नळयोजना आली."(पृ.१३४)

गिरीजाला असं एकदा स्वप्न पडलं की,

"पुंजा आता पुरताच पागल झाला होता. रस्त्याने चालताना अंगावरचे कपडे फाडू लागला. डोक्यावरचे केस ओढू लागला खदखदा हसू लागला. करकरा दात खाऊ लागला. त्याच्यामागं लेकरं फिरु लागली. चिडवू लागली. हुयो करू लागली. त्याला दगड मारू लागली. एकाच टकुरं फोडलं लोकांनी मारले कोणी हातात काठी ,दगड, कुऱ्हाड, लोकांनी मारलं पुजांचा मुडदा पडला,

त्याच्या अंगावरून रक्ताचा पाट वाहायला लागला. तो सरळ पाण्याच्या टाकीपर्यंत वाहत गेला. तिथून वर चढून टाकीत उतरला टाकीतून हे रक्त पाईपलाईनमध्ये उतरले नळावर झुंबड करून पाणी भरणाऱ्या पोरीसोरीच्या घागरीत पडलं, माणिक भाबंळ्याच्या दाराच्या नळावर गिरीजाही घागर भरत होती. तिचीही घागर रक्तानं भरली. तिनं घागरं उचलली अन् ती लालभडक रक्त पाहून भ्याली . मोठ्यानं ओरडली. तिच्या हातची घागर पडून फुटली. मोठ्यानं आवाज झाला गिरीजा जागी झाली"(पृ.१३७,१३८)

"पखाल बंद झाल्या कारणाने कित्येकजणांनी जीव दिला, शेतमजूरी पत्करली. काही झुरत बसले. पागल झाले."(पृ.१३८)

"पुंजाची गत उंकडे फुकायला सोडलेल्या गाढवासारखी झाली"(पृ.१४५)

" पुंजाच्या पागलपणाचा बळी गिरजा ठरणार होती पण स्वत: सुमनच पोरगं आपला नातूचा बळी घेतला",(पृ.१५)

एकंदरीत या उपघटकामध्ये आपण ,औद्योगिकीकरण आणि सुधारण्याच्या नावाखाली आलेल्या धरण, हापस्या व नळयोजना यांनी

मच्छिमार व पखाली कोळी यांना नामशेष कसे केले?. याचे जे 'पखाल' व 'झावळं' या कादंबरीत चित्रण आले होते त्याचा सविस्तर आढावा घेतला याचबरोबर या योजनांनीच कोळी समाजास कसे गिळंकृत केले व त्यांची अवस्था दिशाहीन कशी केली. कोळी कुटुंबाचे जगणे मुश्किल करून जीवनाचा कचरा कसा झाला याबाबतीतची चर्चा सविस्तरपणे केली.

## ५. कोळी समाजाच्या समूह मनाचा शोध

प्रस्तुत दोन्ही कादंबऱ्यांनी कोळी समाजाचे चित्रण तर वास्तवपणे केलेच पण त्याचबरोबर कोळी समाजाच्या नळयोजना, हापस्या व धरणामुळे झालेल्या भयकंपित अवस्थेचे चित्रणही केलेले दिसून येते. या कादंबऱ्यांनी कोळी समाजाच्या व्यथा,वेदना,दारिद्र्य शोषण,उपहास अज्ञान आदी बाबींवर चांगल्याप्रकारे चर्चा केली. एवढेच नव्हे तर आता कोळी समाजाला पूर्वीप्रमाणे राहता येणार नाही. त्याला नव्या काळानुसार संदर्भ घेऊन जीवनमान व व्यवसायात बदल स्विकाराचा लागेल याची जाणीव ही कोळी लोकांना या लेखकांनी करून दिली आहे. एकूणच त्यासाठी 'झावळं' मध्ये सोनी तर 'पखाल ' मध्ये 'गिरीजा ,दगडू या व्यक्तिरेखा उभ्या केल्या आहेत. तसेच पुंजा व काशिनाथ या नायकाचा आपला परंपरागत चालत आलेला व्यवसाय बंद पडल्यामुळे त्यांची दुभंगलेली मने वेदना,विद्रोह,सुख-दु:खे आणि पुढे नवीन काहीतरी करण्याची उमेद ,इच्छा,आकांक्षा, जिद्द आदी बाबी ह्या व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. उत्तम तुपे यांची 'झावळं 'आणि बाबाराव मुसळे यांची 'पखाल' महाराष्ट्रातील कोळी समाजावरील प्रातिनिधिक स्वरूपाच्या कादंबऱ्या आहेत. यातील काशिनाथ,पुंजा आणि त्यांचे कोळी कुटुंब म्हणजे सर्व महाराष्ट्रातील कोळी समाज असे ग्रहितक या कादंबरी लेखनामागील असल्यामुळे यातून सदर पात्रांच्या तोंडून व्यक्त होणाऱ्या भावना ह्या संपूर्ण कोळी समाजाच्याच आहेत. त्यामुळे या कादंबऱ्यांनी कोळी समाजाच्या समूह मनाचा शोध घेतला असेच

आपणाला म्हणावे लागेल. या दोन्ही कादंबऱ्यातून व्यक्त झालेल्या कोळी समाजाच्या समूह मनाच्या भावना पुढील काही संदर्भान्वये आपणाला स्पष्ट करता येतील.

'झावळं' या कादंबरीत सरकार,नदी, परमेश्वर आदींना पुढे करून या भावना व्यक्त होताना दिसतात.

"भगवंता, का कठोर झाला? का कोपली माइयावर नदीमाई ? काय अन्याय झाला हुता ह्या लेकराचा तवा ही एवढी सजा भोगायचं नशिबी आणलं?," (पृ.५)

> "ए,येतो म्हणू सांगा की , जाऊ या उद्यापरनं, तेवढेच धा,बारा दिसाचा रोजगार घालतू, ते काय थोडं झालं ? आता नदीला पर तलाव झाला की, ह्याच लोकांचा पाय धरायची वेळ येणार आज त्यास्नी आपली गरज, उद्या आपल्याला त्याची गरज लागणार",(पृ.५१)

> "राती काय भागं – गाजा पिऊन नदीला गेला हुतास काय, तवा हे पागिरं फोडून आणलेयस! पाण्यात उतरायला भ्या वाटतं तर कोळ्याच्या जन्माला कशाला आला? वाण्या उदन्याच्या घरात जन्म घियाचा हुतास!" ,(पृ.१)

> "येड्या, ह्या दिसांत कोळ्यानं सावध व्हावं लागतं",(पृ.७)

> "सुब्या,बेन्या तू कोळ्याच्या पोटी उगाच जलम घिटलास व वाईचं कुठ खेकड्यानं चावलं न्हाय, तर वाघानं फोडल्यागत रडतूस ! हे बघ! वामटीन हात फाडल्यात हित खेकडा चावला मला ,मला, म्या डुस तरी केले काय? राती पाण्यात शिरून धामीन मारली खोत्यातली",(पृ.२१)

"सोना,इतकं मनाला लाऊन घिऊ नुको, हजारदा मरूण जितं हुणाऱ्या हाराळीगत आपला जलम हाय ह्यो एक अपघात त्यानं आसं खचायचं न्हायं चल, पुन्हीदा उभारी धर",(पृ.२७)

"नाऱ्या, नदीच्या पिकाचं बी आसलं याप बघ. शेतागतच पाण्याखाली लपल्याली पिकं जपायची. पर ते तुला न्हाय कळायचं त्यासाठी कोळ्याच्याच पोटी जलम घिया पायजी"(पृ.५३)

"पाण्यातलं दु:ख बघायला कोळीच व्हायला लागतं"(पृ.७०)

"लेका बाब्या, तुला गंमत वाटली. आमचं दु:ख आम्हाला ठावं, पुढं कव कोळ्यांच्या घरी जलम घे मजी कोळ्याचे जगणं कसं हाय, ते कळंल तुला"(पृ.८५)

"तळ्यातल्या खडकाचा तुकडा जिता घेऊन पाण्यावर तरंग चालल्यागत त्या वक्ताला काशिनाथ पाण्यात दिसायला लागला. एकटा-एकटा पाण्यात मरण पाठीवर घेऊन जगण्यासाठी ,जगविण्यासाठी पोटासंग जाळी धरून धडपडत हुता"

"सोने. आसलं काय बी बोलायचं न्हाय माझा जीव तुझ्या वटीत हाय. त्याला जप. माझं काय ,मुठीत मरण घेऊन जगतोय मूठ सुटली की मरण पोरगा झाला तर त्याला शिकवायचं,लई लई शिकावायचं. त्याला हे किड मारायला लावायचं न्हाय,मोठ ा साहेब करायचं बघ"
"आन् पोरगी झाली तर?
तिलाबी शिकवायची ,मडबीन करायची "( पृ.९६)

"कृष्णा, हिकडं येऊ नगंस, ह्या जाळ्यात गुंतून पडशील जाळयाचं करायचं काय पुढं शिक मोठा हो! हे आसं आमच्यागत जाळ्यात गुतू नको" (पृ.१२७)

" हरिनारायणा, तुम्हास्नी शेतंमळं हायती, माझा मळा देवानं नव्ह ह्या सरकारनं जाळली. माझी पिकं माझं चंदेरी धन पार बुडलं. माझी आई मारून टाकली. ह्या सरकारनं. मला पोरकं केलं. आत्ता माझं सुखदु:ख मी कुणाला सांगायचं? येळ परसंग आला तर ह्या माझ्या आईच्या निळ्या पदराखाली मला आधार हुता. हरिनारायणा, काय झालं हो. " (पृ. १२८)

" गावाच्या वरनं आलेला बिढाल पाट पाण्यान भरून खळखळ वाहत हुता. निळ्या पाण्यातल्या जिवावर हिरवी रानं उंच-उंच होऊन डोलत होती. काशिनाथ पाटाच्या पाण्यात जीव सोडून हिरवा-हिरवा झाला होता नि रोज पाण्यात भिजणारी देही मातीनं मळवून घराकडं येत हुता. जित्या सोन्याच्या कांबी उचलणारं सोनीचं हात तिच्या चंदेरी पिकाला मुकलं होतं निमी हातात काटं-काटं टोचून घेता-घेता पिकं भांगलत हुती नि नितंनेमरनं नदीच्या कोरड्या वाळूत पडलेल्या झावळ्याच्या काट्या मोडून आणून पोटं शिजवत हुती" (पृ. १२८)

' झावळं ' प्रमाणे ' पखाल ' मध्येही काही संदर्भ आलेले दिसून येतात.

" पुंजा जातीनं कोळी त्याच्या किती पिढ्या असें पाणी भरभरून मातीआड झाल्या असतील देवजाणे. कोळ्यात प्रकार अनेक पखालीनं किंवा डोक्यावरून भरणारे पाणीभरे कोळी हे बहुदा नदीकाठी, समुद्राकाठी राहतात.काहींनी अंबाडीच,

बरूचा ताग काढून त्याचे दावे-ढोरखंड करून विकण्याचा धंदा केला. काहींनी दारू काढून विकणे नि पिणे असेही धंदे केले. खुन-दरोडे, चोऱ्या, वाटमाऱ्या यातही कोळी मागे नव्हते. नंतर रामायण लिहिणारा वाल्या हा ही कोळीच होता हाच तो सगळ्या कोळ्यांचा पुराणपुरूष त्यामूळे कोळी समाजाला ' वाल्मिकी समाज ' असेही म्हणण्याचा प्रघात आहे. काही कोळी मेलेल्या ढोराचं कातडं फाडून विकणारे आहेत. काही पाणभरे कोळ्यांनी हुशारी केली. बलुत्याशिवाय थोडीफार शेती विकत घेतली ते शेतकरी शेतमजूर झाले पण न घेणाऱ्यांचे काय ? ....." (पृ.१०,११)

" पुंजाला धंदा बंद झाल्यावर कळलं आपण न्हाय शिकलो ते शिकलो निदान दगडूलाच शिकवायला पाहिजे होतं "[,

" लोकांनी पूर्वी कोळ्यांना वापरून घेतलं आता नळ योजनेनंतर विचारलं नाही. ",

" पुराणातल्या राक्षसासारखा आपण आपला प्रचंड हात बसल्या जागेवरून लांबवावा अन् गावाकडे चाललेली ठेकेदाराची जीव हाताच्या मुठीत धरून आतल्या ठेकेदारासह तिचा चेंदामेंदा करावा. तशीच गत पाण्याच्या टाकीचीही शेवटी नळयोजनेच्या विहिरीनही तळहात दाबून धरावा अन् काम करणाऱ्या मजुरांना गुदमरून ठार करावे नंतर दोन मुठी टाकून विहिर बुजून टाकावी.",

(पृ. १०४,१०५)

"रस्त्यावर जागोजाग नळयोजनेचं थाटकं वर काढलेले, त्याला दोन बाजूंनी तोट्या सगळ्या गावावर जमिनीतून पसरविलेलं परिपच जाळं , जणू ते पार ध्यायचं जाळं आपल्याला आडकविण्यास अंथरलेलं आपण खरंच या जाळ्यात

अडकलो. मोकळे असूनही अडकलो. यातून सूटका करून घेता येईल का ? आपल्याला हे जाळे तोडता येईल का ? काय करावं लागलं, पाईप उकरावे लागतील? स्टँड मोडावे लागतील ? पाण्याची टाकी पाडावी लागेल? पाण्याची विहिर बुजवावी लागेल?"

आधी आपल्यात ताकद होती नळयोजनेचे काम चालू झाल्यापासून आपण थकत-थकत चाललो असं आपल्याला वाटते. त्या कथेतल्या शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकलेल्या सिंहासारखी आपली गत झाली त्या सिंहाला तरी लहानसा सोबती उंदीर होता. आपल्याला कोण एवढा जिवाचा जिवलग सोबती आहे? आपली बायको, पोरं, सून,सगे-सोयरे, कोणीच नाही एक आपणं एकटे वाल्या कोळ्यासारखे कोणापाशी जावं. आपलं दु:ख सांगावं कोण आहे तसा? (पृ.१३३)

"पखाल बंद झाल्या कारणाने कित्येकजणांनी जीव दिला, शेतमजूरी पत्करली, काही झुरत बसले, पागल झाले"(पृ.१३८)

"पुंजाची गत उंकडे फुकायला सोडलेल्या गाढवासारखी झाली." (पृ.१४५)

"पखाल आता फक्त घरासाठीच होती. भाकरीसाठी लाचार बनेल पण बट्टा लावून घेणार नाही कोळी."

"पखालीच्या धंद्यात कोळ्याचं काय भलं केलं वाडवडिलांनी धंदा केला. गाववाल्याकडून उपेक्षा,टिंगल अन् पोटभर दारिद्रय,उन,वारा,पाऊस,दिवस-रात्र या कशाकशाचा विचार न करता त्यानं पखाली वाहिल्या. कधी बसून आबदशीर भाकरी खाल्ली नाही. वा हवालदार म्हणून चार-दोन गावाला गेला नाही. म्हशीसोबत फक्त पखाली वाहिल्या", (पृ.१५७)

"तुमच्यात इतकी हिंमत असेल तर चल माझ्यासंग, धर त्या गावात नळयोजना आणणाऱ्या सरपंचाच मनगट अन् घाल त्याच्या

टकुऱ्यात फाडी. चाल्ला मशीले माप अन् पखालीले [इंजेक्शन देयाले,] ~~इत्तकेच जपले~~.",(पृ.१५१)

"तुझ्यात ताकद असेल तर पाड ती नळयोजनेची टाकी बुजव ती विहिर. टाक उपटून भुईत पुरले के नळ."(पृ.१५१)

"काम मिळालं नाही तर भिक मागू कोणाचे ठोबरं भरू
पण गावावर रहायचं नाही"(पृ.१६८)

"मला वाटते बसुनी विमानी
अफाट गगनी हिंडावे
किंवा सुंदर नौकेमधून
भरभरून हिंडावे"(पृ.१६८)

"म्याऊ म्याऊ घुगऱ्या खाऊ
पखालीचं पाणी पिऊ
बाळराजाले खेळाय नेऊ
कुर्र ऽऽ रेऽऽऽ" (पृ. १३१)

"तुका म्हणे घ्याला
पाणी भरता -भरता मेला"(पृ.१५७)

अशा अनेक संदर्भाचा विचार करता कोळी समाजाला आता स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव झालेली आहे. त्याला आपल्यावर सरकारने म्हणजेच औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या सुविधांनी कसा अन्याय केला हे कळून चुकले आहे. स्वत:ची अवस्था उकिरड्यावरच्या गाढवासारखी झाली असली तरी त्यावर काहितरी पर्याय शोधण्याच्या धडपडीत आहे. परंतु मुळचाच हा अशिक्षित समाज असल्यामुळे अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. त्याला जीवनामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक तडजोड करताना अनंत अडचणी येत आहेत. त्यामुळे तो आपले परंपरागत व्यवसाय बंद करणाऱ्या सरकारवरच आपल्यावरील अन्यायाचे खापर फोडत आहे. तसा विद्रोह व भावना सदर कादंबरीतून पुंजा व

काशिनाथच्या तोंडून व्यक्त झालेल्या आहेत. त्यांनी आता आपल्या मुलांना-नातवंडांना शिकवून मोठे साहेब करण्याची इच्छा-आकांक्षा मनात धरली आहे. त्या मुलांना शिकवण्यासाठी पाहिजे ते कष्ट उपासण्याची तयारी आहे. स्वत:चे आयुष्य पाणी भरता-भरता आणि मासेमारी करता-करता गेले असले तरी तसे मुलांनी करू नये अशी प्रामाणिक भावना या कादंबरीतून व्यक्त होताना आपणाला पहावयास मिळते. एकुणच कोळी समाजाच्या समूहमनाचा शोध उत्तम बंडू तुपे आणि बाबाराव मुसळे या लेखकांनी घेतलेला आहे.

# ३.कोळी समाजाचा इतिहास, मूलभूत प्रश्न आणि उपाययोजना

'झावळं' आणि 'पखाल' या कादंबऱ्यातील कोळी समाजजीवनाचे चित्रण करीत असताना आतापर्यंत आपण कोळी समाजाचे परंपरागत व्यवसाय , रूढी-परंपरा,देवधर्म,धार्मिक श्रद्धा-अंधश्रद्धा,प्रचलित लोककथा, जातपंचायत, आचार-विचार आदी बाबींचा विचार फक्त या दोन्ही कादंबरीच्या अनुषंगाने करण्यात आलेला आहे. जरी या कादंबऱ्यात महाराष्ट्रातील प्रातिनिधीक स्वरूपाच्या कोळी समाज हा चित्रीत असला तरी व्यापक स्वरूपात पाहिजे तेवढा विचार सर्व कोळी जमातींच्या बाबतीत करण्यात आलेला नाही. म्हणून आताच्या इ.स. २००५ चा विचार करता कोळी समाजाचा इतिहास, मूलभूत प्रश्न व उपाययोजना यासंबंधी चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

भारतातल्या अनेक जाती-जमातीपैकी 'कोळी' ही एक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत नमुद केलेली आदिवासी जमात आहे या जमातीचा निर्माता महादेव असल्याचा संदर्भ एका प्राक्कथेत आलेला आहे तो याप्रमाणे. "एकदा महादेव व पार्वतीचे

भांडण झाले. तेव्हा महादेव रूसून पृथ्वीवर आला. पंचमठीच्या डोंगरावर उतरला तेथे राहणाऱ्या एका आदिवासी कोळी तरूणीला पाहून तिच्यावर भाळला अन् तिच्यासोबत संसार करू लागला. तिच्यापासून जी पैदास झाली. ती महादेव कोळी तेव्हापासून सर्व कोळी 'महादेव कोळी' म्हणून ओळखला जावू लागली." कालांतराने दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीमुळे स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी काहिंनी पुजा करणे,पाणी भरणे, मासेमारी करणे,ढोरं विकणे, नावा चालवणे, चुना विकणे आदी विविध प्रकारांची कामे केली म्हणून त्यांना त्या त्या कामाच्या स्वरूपानुसार महाराष्ट्रातून पखाली कोळी, मच्छीमार कोळी ,महादेव कोळी, ढोर कोळी,नावाडी अशी नावे पडली. प्रस्तुत 'झावळं' कादंबरीत 'मच्छीमार' आणि 'पखाल' मध्ये 'पानभरे कोळी' या कोळी समाजाचे चित्रण तुपे व मुसळे यांनी केलेले आहे. ह्या दोन्ही पोटभेदासह सर्व कोळी समाज मुळच्या 'कोळी' या जमातीत मोडतो. सर्वांचा सर्वकर्ता हा एकमेव महादेव आहे. इ.स. १२ व्या शतकांपर्यंत तो डोंगरदऱ्या -जंगले आदी भागात फिरत राहिला. त्यानंतरच्या काळात राजे-राजवाड्यांनी पालकीला खांदा देणे, संरक्षणासाठी या जमातीचा वापर करून घेतला. १६ व्या शतकात पेशव्यांनी कोळ्यांचा वापर राजदरबारी करून घेऊन त्यांना वतने दिली परंतु १८ व्या शतकात इंग्रजांनी आपल्या राजकारभारातून कोळ्यांना दूर केले . मग पुढच्या काळात डोंगरदऱ्यातून पेशवे-इंग्रजापर्यंत आलेल्या कोळयांनी वर नमुद केल्याप्रमाणे गरजेनुसार गावोगावी, नदीकिनारी, समुद्रकिनारी आश्रय घेऊन मच्छीमार,नावाडी, पानभरे अशी कामे केली व त्या धंद्यानुसार त्यांना तशी आडनावे पडली. कोळी जमातीत पोटभेद निर्माण झाले. मुळ डोंगरदऱ्यात राहिलेला कोळी तिथेच डोंगर दऱ्याखोऱ्यात जंगलात भटकत राहिला आणि इकडे स्थलांतरीत झालेला मूळचा महादेव कोळी समाज विविध कामे करून आपली

उपजीविका करू लागला. ही कामे १९७० पर्यंत पिढ्यानपिढ्या चालत आली. परंतु त्यानंतरच्या काळात औद्योगिकीकरणाच्या नावाखाली आलेल्या हापस्या, नळयोजना, धरण, आगबोटी आणि विविध छोटी-मोठी यंत्रे यामुळे या परंपरागत चालत आलेल्या धंद्यावरती विपरीत परिणाम झाला. आणि १२ व्या शतकाच्या पूर्वी जशी अवस्था होती तशीच पुन्हा एकदा झाली. महाराष्ट्राची राजधानी 'मुंबई' हिला सर्वप्रथम कोळी समाजानेच वसविले आहे. यासंबंधीचा लोकशाहिर आत्माराम पाटील यांचा पोवाडा बोलका आहे.

"सात बेटांची अेक माऊली, मुंबाआई आपुली|
कोळी भंडारी मूळ पूजारी, बोली मराठमोळी," [४]

याशिवाय समुद्रावर मासेमारी करून जगणाऱ्या कोळी बांधवावर आगबोटी आल्याने कसा विपरीत परिणाम झाला याविषयीचा संदर्भ दै. लोकसत्ताने 'महिमा मुंबईचा' या लेखात दिलेला आहे.

> "मुंबईचे कोळी समाजाचा प्रमुख धंदा मासेमारी होता. मासे पकडण्यासाठी जहाजाचा वापर करण्यात येत होता. परंतु वैज्ञानिक तंत्रज्ञान आले व त्याचा परिणाम म्हणून जहाजाऐवजी आगबोट आली. बोट समुद्रात जास्त दूर जाऊन मासेमारी करू लागली. परिणाम मासे किनाऱ्याकडे वा ठराविक अंतरापेक्षा अलिकडे आले नाहीत याचा परिणाम सामान्य कोळ्यांच्या धंद्यावर झाला वव धंदा बसला" [५]

अशापद्धतीने आज कोळी समाजापुढे विविध प्रश्न असलेले दिसून येतात.

कोळी समाज हा श्रद्धाळू व निष्ठावान समाज आहे. तो आपल्या परंपरागत चालत आलेल्या रूढी व परंपरा काहीही केल्याने सोडायला तयार नाही. याशिवाय तो आजपर्यंत अशिक्षित असल्यामुळे या समाजात

अनेक धार्मिक श्रद्धा-अंधश्र व गैरसमज आहेत. याच कारणाने तो पाहिजे तेवढा सुधारण्याच्या अवस्थेत नाही. समाजातील काही समाजसुधारक, कार्यकर्ते, संघटना त्या याबाबतीत प्रयत्न करतात. परंतु या जमातीत मूळ प्रवृत्ती संघटित होण्याची,शिक्षण घेण्याची नसल्यामुळे मागासलेपण हे दिवसेदिवस वाढत आहे. काळानुसार नवीन संदर्भ स्विकारण्याची वृत्ती नसल्यामुळे परंपरागत अवस्थेतच आपले जीवन जगत आहे.या समाजाला समाजभिमुख व विकसीत करण्यासाठी आपणाला काही उपाययोजना व पर्याय योजता येतील.

या समाजाला शिक्षण घ्यायला प्रवृत्त केले पाहिजे. त्यासाठी शैक्षणिक सुविधा,स्कॉलरशीप वेळेवर द्यायला पाहिजेत.सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत नमुद केल्याप्रमाणे 'कोळी' या मूळ जमातीस 'अनुसूचित जमातीचे' दाखले द्यायला हवेत. परंतु सध्या सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे व स्थलांतरीत मुद्यावरील काही पोटजातींना हे दाखले दिले जात नाहीत. आज समाजातील तरूणांनी उच्च शिक्षण घेऊन, संघटित होऊन संघर्ष करायला तयार झाले पाहिजे. जोपर्यंत संघर्षास तयार होत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावरील दाखल्याचा अन्याय दूर होणार नाही. आज थोडेफार तरूण शिकले आहेत. परंतु त्यांना आर्थिक,शैक्षणिक आणि दाखल्याच्या अडचणीमुळे नैराश्य आले आहे. ते दूर करणे हे कोळी समाजातील नेते,कार्यकर्ते,समाजसुधारक याप्रमाणे इतर समाजाचे व सरकारचे काम आहे. जर त्यांचे शैक्षणिक, सामाजिक,राजकीय,आर्थिक, सांस्कृतिक व भौगोलिक प्रश्न सुटत नसतील तर समाज पूर्वजाप्रमाणे व्यसनाधिनतेकडे, मोलमजुरी ,भटकंती,नैराश्येकडे झुकेल म्हणून या समाजाच्या मूलभूत समस्या सोडविणे हे आजच्या काळाची गरज आहे.

## ४.समारोप

'झावळं' आणि 'पखाल' या कादंबऱ्यातील कोळी समाजजीवनाचे चित्रण करीत असताना या प्रकरणामध्ये आपण कोळी

समाजाचे पखालीने पाणी वाढणे व मासेमारी करणे ह्या प्रमुख व्यवसायाबरोबर म्हैस भळवणे, चुना विकणे, गुरांचा व्यापार करणे, दूध विकणे यासारखे व्यवसाय करू लागला आणि दिवस-रात्र, वेळी-अवेळी तो राबू लागला. या व्यवसायाच्या संबंधितच तो महादेव. खंडोबा, म्हसोबा, भैरीनाथ, माऊलाया व साती-आसरा या दैवतावर श्रद्धा ठेवू लागला. या सर्व देवता प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष आपल्या व्यवसायाला मदत करतात अशी त्याची निष्ठा होती. जेथे श्रद्धा तेथे अंधश्रद्धा ही आलीच. याकोळी समाजात, 'गरवारपणात खेकडा खाऊ नये, पोरं फेंगडी चालतात., 'बोबील खाऊन माशाला गेलं की सगळी बोंब हुती','पावसात इस्तु टाकला की पाऊस उघडतो' यासारख्या अंधश्रद्धाही असलेल्या दिसून येतात.

इतर जाती-जमातीप्रमाणे कोळी समाजात ही सुदीच्या महादेवाची यात्रा भरते. व तिथेच जातपंचायत होते. आपआपसातील वाद मिटविणे, फारकत्या करणे, कपडे-लत्ते ,भोडी-कुंडी खरेदी करणे, जातबांधव सगे-सोयरे यांच्या भेटीगाठी घेणे, सोयरिक-धायरिक जमविणे, सरकारी योजनांची माहिती देणे अशाप्रकारच्या चर्चा होत असलेली दिसून येते. कोळी समाजात आपल्या व्यवसायाच्या व देवधर्माच्या संबंधित अनेक ऐतिहासिक- पौराणिक,लोककथा व प्राक्कथा ह्या या दोन्ही कादंबरीत आलेल्या होत्या. त्याही येथे नमूद केल्या आहेत. कोळी समाजाचा व्यवसाय परंपरागत चालत असतानाच १९७० च्या आसपास नळयोजना, हापस्या,धरण यांनी औद्योगिकीकरण व सुधारणेच्या नावाखाली आगमन केले आणि त्यामुळेच कोळी समाजाचे आजपर्यंत चालत आलेला व्यवसाय बंद पडला. आपोआपच त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी येऊन समाजाचा कचरा झाला. आपल्यावर सरकारने विविध सुविधा आणून गंडांतर आणले. आपल्यावर अन्याय अत्याचार केला समाजिक, शैक्षणिक,राजकीय,आर्थिकदृष्ट्या सोयी सवलती दिल्या नाहीत म्हणून याचे खापर फोडीत असताना,"तुझ्यात ताकद असेल तर पाड ती नळयोजनेची टाकी बुजव ती विहिर टाक उपटून,भुईत

पुरलेले नळ" अशासारखी विद्रोहाची भावना तर व्यक्त केलीच पण त्याचबरोबर मुला-नातवांनी शाळा शिकून मोठे 'साहेब' होण्याची इच्छा अपेक्षाही व्यक्त केली.

प्रत्येक जाती-जमातीला स्वत:चा असा इतिहास असतो. त्याप्रमाणे 'कोळी जमात' ही पूर्वीच्या काळी महादेवापासून विस्तारीत झाली. तेव्हा 'महादेव कोळी' म्हणून ओळखली जावू लागली परंतु दरम्यानच्या काळात उपजिविकेचे साधन म्हणून ह्या समाजाची भटकंती झाली. आणि विविध व्यवसाय करायला सुरूवात केली. या व्यवसायानुसार त्यांच्यात पानभरे,मच्छिमार,ढोर,महादेव आदी पोटभेद पडले. आज हा संपूर्ण समाज शैक्षणिक,राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास असून त्यांना विकसीत करण्यासाठी शैक्षणिक ,आर्थिक,राजकीय व सामाजिकदृष्ट्या सोयी सुविधा दिल्याच पाहिजे. पण त्याच बरोबर डॉ. आंबेडकरांनी घटनेत नमुद केल्याप्रमाणे 'अनुसूचित जमाती' चे दाखले सर्व पोटजमातीसह देणे अत्यावश्यक आहे.याशिवाय कोळी समाजातील तरूणांनी, कार्यकर्ते, नेते व समाजसूधारकांनी संघटित होऊन आपल्या विविध समस्यांची सोडवणूक संघर्षाव्दारे व उपाययोजनेव्दारे करणे हीच काळाची गरज आहे.

# ७.संदर्भ ग्रंथ सूची


१.डॉ. सरोजनी बाबर (संपा), 'जनलोकांचा सामवेद' शंकर-पार्वती (लोकगीत) संग्राहक अनिल दिनकर फडके, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुणे, पुष्प १२ वे, पृ.१३१

२ भालचंद्र नेमाडे, " साहित्याची भाषा " साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८७, पृ. ३४

३ डॉ. विश्वनाथ शिंदे,' समुचित' ,' दांगडी पोवाडा ', स्वरूप व सौंदर्य (लेख) ए. मे. जून १९८८

४ लोकशाहिर आत्माराम पाटील ,' लोकयुगीन आत्मशाहिरी' (भाग-१ ), पोवाडा व कवने, सत्यश्री प्रकाशन, मुंबई. पृ.८२

५ दै. लोक सत्ता, ' लोकमुद्रा दिवाळी विशेषांक ' 'महिमा मुंबईचा ' (लेख, )ग्रंथाली प्रकाशन मुंबई. पृ. ९